Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य विश्वातील योगदान

**प्रा. डॉ. दिनकर माने**
विभाग प्रमुख
जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
औरंगाबाद

**भानुदास लक्ष्मण दोबाले**
एम.ए.(एम. सी.जे.) एम.फील.
जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
औरंगाबाद, मो. 9665789869

**प्रस्तावना:**

अण्णाभाऊ साठे म्हणजे साहित्यातील एक सोनेरी पान असे म्हणावे लागेल सदरील संशोधनाचा महत्त्वाचा पैलू म्हणजे समाजातील तळागाळातून येऊन समाजाची वास्तववादी दर्शन आपल्या साहित्यातून जनसामान्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य अण्णाभाऊंनी केले. 19 व्या शतकात महाराष्ट्राच्या जडण घडणीत ज्या साहित्यकांनी योगदान दिले त्यात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे महत्त्वाचे स्थान आहे. साहित्य विश्वात आपल्या साहित्य लेखनातून अण्णाभाऊंनी एक वेगळे स्थान निर्माण केले ही बाब नाकारता येत नाही. साहित्यरत्न अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून एक वेगळी वास्तववादी साहित्याची छाप जगभर पाडली. दारिद्य, गरिबीने खितपत पडलेल्या समाजाला आपल्या वास्तवादी साहित्यातून जागृत करण्याचे कार्य अण्णाभाऊंनी केले. दीड दिवस शाळेत गेलेला तुकाराम ते आपल्या साहित्याच्या लेखणीवर रशिया वारी करणारे अण्णाभाऊ महाराष्ट्रातील एक महत्त्वाची साहित्यिक म्हणून गणले जातात. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य शंभर वर्षे झाले तरी अजूनही तेवढेच ताजे आहे व जनमानसात लोकप्रिय आहे यावरून त्यांचे साहित्य लिखाणाचे महत्त्व आपल्या लक्षात येते. साहित्याच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे कार्य अण्णाभाऊंनी केले. आपला साम्यवादी व वास्तववादी लिखाणाचा विचार घेऊन आयुष्यभर संघर्षमय जीवन जगत अण्णाभाऊं साहित्य विश्वाला समृद्ध करणारे एक महान साहित्यरत्न होते.

**अण्णाभाऊ साठे व त्यांचे साहित्य विश्वातील योगदान:**

महापुरुषांचे चरित्र म्हणजे अर्धा इतिहास असतो असे कार्लाईने म्हटले आहे. तसेच त्याचे साहित्य हे जनसंवदाचे साधन असते. ज्या परिस्थितीमधून अण्णा भाऊ आले त्या परिस्थितीचा अभ्यास केल्यास त्यांच्या साहित्याची मुळे जनमानसात खोल कशी रुजली आहे हे आपल्या लक्षात येते.

अण्णाभाऊ साठे हे एक अभिनेत,कवी, लेखक, नाटककार, आणि समाजसेवक होते. त्यांनी साहित्य विश्वात आपल्या अमूल्य योगदानाने महाराष्ट्रातील साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात विशेष स्थान मिळवले आहे. अण्णाभाऊ साठे यांच्याकडे सुंदर लेखनात्मक क्षमता आणि

विचारशीलतेने आपल्या कामात सकारात्मक परिणाम साधले. त्यांच्या कादंबरी,पोवाडे, कविता, नाटक, गीते, व साहित्यांनी समाजातील विविध समस्यावर मांडणी केली. अण्णाभाऊ साठे यांच्या मुख्य साहित्यात फकीरासारखी अद्वितीय कादंबरी सामील आहे, जिला महाराष्ट्र शासनाने गौरविले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यिक कृतीतून साहित्य विश्वात एक अद्वितीय स्थान मिळवलेले आहे व त्यांचे साहित्य रचना व सामाजिक दृष्टिकोन अनेक लोकांना आजही प्रेरणा देतात. त्यांचं साहित्य विश्वात व सामाजिक क्षेत्रात अद्वितीय स्थान आहे.

अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील विशेषतः कादंबरी लिखाण खूप लोकप्रिय झाले आहे. या साहित्यातून त्यांनी आपले जीवन, भावना याचे वास्तववादी अनुभव मांडले आहे. त्यांच्या साहित्याची भाषा सोपी असल्यामुळे वाचकासाठी ते लोकप्रिय बनले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना दलित साहित्याचे संस्थापक असे म्हटले जाते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत देखील त्यांची महत्त्वाची भूमिका होती अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे आहे. महाराष्ट्राच्या एकूण जडणघडणीत, परिवर्तनात व साहित्य विश्वात अण्णाभाऊ यांचे महत्त्वाचे योगदान मानले जाते.

**अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य:**

अण्णाभाऊ साठे यांनी कादंबरी, कथासंग्रह, नाटक, लोकनाट्य, वग, लावण्या, कथा, कविता, चित्रपट, प्रवासवर्णने, पोवाडे अशा प्रकारचे प्रकाशि, अप्रकाशित दीडशेहून अधिक साहित्याचे लिखाण अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे. त्यामध्ये त्यांची फकीरा ही कादंबरी जनमानसात खूप लोकप्रिय झाली आहे. मराठी बरोबरच त्यांच्या साहित्याचे 22 परकीय भाषात भाषांतरे झाली आहेत. यावरून त्यांचे साहित्य विश्वातील योगदान लक्षात येते.

**उद्दिष्टे :**

1.अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य साहित्य विश्वात आपला वेगळा ठसा उमटवते.

2. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास करणे व त्यांच्या साहित्यामुळे साहित्य विश्व कसे समृद्ध झाले याचा अभ्यास करणे.

3. अण्णा भाऊ यांच्या साहित्यामुळे साहित्य विश्वाला एक वेगळी दिशा मिळाली आहे.

4. अण्णा भाऊ यांच्या साहित्यातील वास्तववादी दर्शन व लिखानाच्या वैशिष्ट्यामुळे अण्णा भाऊंचे साहित्य, साहित्य विश्वात व समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले आहे.

5. अण्णाभाऊ यांच्या साहित्यामुळे समाजात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

**महत्व :**

अण्णा भाऊ साठे यांनी समाज परिवर्तनाच्या चळवळीत मोलाचे कार्य केले आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असेल व समाजाचे परिवर्तन असेल घडविण्याची ताकद होती. अण्णा भाऊ यांच्या साहित्यामुळे साहित्य विश्वाला मिळालेली दिशा याचा अभ्यास करणे तसेच अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास करून त्यांचे साहित्य व विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले आहे का तपासणे व अण्णाभाऊंच्या साहित्यामुळे समाजात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे व तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामुळे साहित्य विश्व कसे समृद्ध झाले याचा अभ्यास करणे यामुळे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य विश्वातील योगदान हा विषय महत्त्वाचा वाटतो.

**सारांश :**

सदरील शोधनिबंध साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य विश्वातील योगदानाच्या अनुषंगाने आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे एक ऑगस्ट 1920 ते 18 जुलै 1969 या 49 वर्षाच्या संघर्षमय जीवन काळात अण्णाभाऊंनी संपूर्ण महाराष्ट्राच्या साहित्यिक क्षेत्रामध्ये व सामाजिक क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण कार्य केले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे तळागाळातील मागास समाजामधून येऊन त्यांनी साहित्य क्षेत्रामध्ये ज्या पद्धतीने कार्य केले आहे ते उल्लेखनीय आहे. त्याचबरोबर अण्णाभाऊ साठे यांनी गिरणी कामगाराचे प्रश्न असतील संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असेल याचबरोबर सामाजिक क्षेत्रामध्ये देखील उल्लेखनीय कार्य केले आहे. गोरगरीब, वंचित, शिक्षणापासून दूर असलेला बहुजन समाजाला आपल्या वास्तववादी साहित्यातून प्रेरणा देण्याचे काम अण्णाभाऊंनी केले आहे. आपल्या साहित्यातून स्त्री पुरुष समानता, भेदभाव यावर टीका करताना अण्णाभाऊंनी समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. या सर्व गोष्टीमुळे अण्णा भाऊंचे साहित्य विश्वातील योगदान महत्त्वाचे वाटते. अण्णाभाऊंच्या साहित्यामुळे साहित्य तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले हे अण्णाभाऊंच्या साहित्याचे फलित म्हणावे लागेल.

**निष्कर्ष:**

अण्णा भाऊंच्या साहीत्यातनू थकलेला, गंजलेला, व्यवस्थेने उध्वस्त झालेला अन्यायग्रस्त अशा समाजातील प्रत्येकाला अण्णा भाऊंच्या साहित्यातील विचार जीवन जगण्याची ऊर्जा प्राप्त करून देतात . जीवनात हार न मानता सतत धडपडत, संघर्ष करत जीवनाला पुढे घेऊन जाण्यासाठी अण्णा भाऊांनी सांगितलेल्या 'जग बदल घालुनी घाव सांगनू गेले मज भीमराव' या विचारांपासून प्रेरणा घेत माणूस आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टकोन बदलतो .भेदभाव विरहित आजच्या समाजाला आवश्यक असणारी वैचारिक भूमिका निर्माण करण्यासाठी अण्णा भाऊंच्या साहित्य साहित्य विश्वात पथदर्शक ठरतात.

अशाप्रकारे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून साहित्य विश्वात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या संशोधनातून काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे सांगता येतील

1. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य अक्षर,अभिजात, पुनःप्रत्ययाचा आनंद देणारे असून ते आजही समाजाला उपयोगी आहे.

2.अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून समाजाचे वास्तव यथार्थपणे मांडले आहे तसेच हे वास्तव ते कुशलतेने प्रगट करतात

3. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा साम्यवाद हा आत्मा आहे. गरिबीतून सामाजिक न्यायासाठी केलेला संघर्ष ही त्यांची मानवी मूल्य आहे तो त्यांचा विचार आहे.

4. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संवाद कौशल्य हे प्रत्यक्ष सामाजिक अनुभवावर आधारलेली होती त्यामुळे त्यांचे साहित्य विश्वात व समाजात लोकप्रिय झाले.

5. अण्णाभाऊ साठे यांच्या समग्र जीवनाचा वैचारिकता हा आधार आहे त्यांनी जे संघर्षमय जीवनाचा प्रवास केला तो वैचारिक प्रमयावर आधारलेला होता.

6. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हिंदी, पंजाबी,बंगाली, कन्नड, मल्याळम, सिंधी भाषेत अनुवादित झाले आहेत तसेच इतर भाषेमध्ये जर्मन,झेक, इंग्लिश, पॉलीस, रशियन या विदेशी भाषेत साहित्य भाषांतरित झाले आहे.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामुळे साहित्य विश्वात एक सुवर्णपान लिहिल्या गेले आहे. अण्णाभाऊंचे साहित्य सर्वत्र लोकप्रिय झाले आहे व यामुळे वाचक साहित्याकडे आकर्षित होत आहे हे अण्णाभाऊंच्या साहित्याचे फलित म्हणावे लागेल.

**संदर्भ सूची :**

1) अण्णाभाऊ साठे आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा -व्ही.एच. हनवते द्वितीय आवर्ती सुधीर प्रकाशन

2) साहित्यसूर्य अण्णाभाऊ साठे, नवनाथ शिंदे, जिजाई प्रकाशन नारायण पेठ पुणे

3) अण्णाभाऊ साठे कर्तुत्व आणि व्यक्तिमत्व सुरेश कृष्णाजी पाटोळे प्रतिभा पब्लिकेशन

4) साहित्य सूर्य अण्णाभाऊ साठे नवनाथ शिंदे जिजाई प्रकाशन पुणे

5) लोकसाहित्यिक अण्णाभाऊ साठे समग्र वांग्मय खंड दोन प्रतिमा पब्लिकेशन्स पुणे